## निशाणी क्र. १७८ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ विरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र. ६ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाली आहे. प्रस्तूत प्रतिवादी ही मुंबई येथे राहत होती. तसेच तीचा वादींशी कायमचा संपर्क नव्हता. त्यामुळे ती मयत झाल्याबाबतची कोणतीही माहिती प्रस्तूत वादींना मिळालेली नव्हती. प्रतिवादी क्र. ७ चे वारसांच्या पत्त्याबाबत प्रस्तूत प्रतिवादींच्या मुलांशी संपर्क केला त्यावेळी प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ विठा रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाल्याचे समजले. त्यामुळे प्रस्तूत प्रतिवादीचे वारस वेळेत दाखल न केल्याने दावा अबेट झाला आहे. प्रस्तूत वादींनी केव्हाही मुद्दामहून वारस दाखल करणेची टाळाटाळ केलेली नाही. केवळ प्रस्तूत प्रतिवादी ही मुंबई येथे राहत असल्याने व तीचा वादींशी कायम संपर्क नसल्याने ती मयत झाल्याची माहिती वादीस मिळालेली नव्हती. प्रस्तूत प्रतिवादी मयत झाल्याची माहिती मिळाल्यावर वादी लागलीच प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाखल करीत आहे. सबब प्रतिवादी क्र. ६ चा अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा हिचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ व बेकायदेशीर असून त्यातील मजकूर प्रतिवादींना मान्य नाही. तसेच पुरावा नाही. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ६ ही दिनांक १२/०३/२०१९ इ. रोजी मयत झाली आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्र. ६ ही मयत झाली आहे, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. ६ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे :

— **आदेश** —

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक : ३०/११/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.12.03 10:28:09 +0530